लातूर शहर महानगरपालिका,लातूर

मुख्य कार्यालय, मेन रोड, टिळक नगर, लातूर

(पर्यावरण विभाग)

स्थापना – २५ ऑक्टोंबर २०२५

फॅक्स:- (०२३८२) -२४६०७४

फोन नं :- (०२३८२)-२४२८०३/२४६०७५

इमेल आयडी – envlmclatur@gmail.com

जा.क्र./लाशमनपाला/प.वि./ 8440 /२०२६-२७ दिनांक 3 /११/२०२६

जाहीर आवाहन

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.S.R.682 (E), dt ५.१०.१९९९ अन्वये १२५ dB (A1) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे.

अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथियम, अर्सेनिक, लीड, मक्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकामुळे विषारी वायू तयार होतात हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाने स्वतःहून दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. ०१/२०२६ मध्ये दि.२२/०९/२०२६ व १५/१०/२०२६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने लातूर शहर महानगरपालिकेमार्फत नागरिकांना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याचे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

१. सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास प्रतिबंध सार्वजनिक रस्ते, रस्त्याच्या कडेला असलेली ठिकाणे, गल्ली, फुटपाथ व इतर सार्वजनिक ठिकाणी सण / उत्सवाच्या काळात फटाके फोडू नयेत.
२. शांतता क्षेत्रांमध्ये फटाके फोडण्यास विशेष प्रतिबंध मा. न्यायालये, रुग्णालये, शासकीय कार्यालये, शाळा व इतर शांतता क्षेत्रांच्या परिसरात फटाके फोडू नयेत.
३. ध्वनिवर्धक यंत्रणेबाबत आवश्यक परवानगी व अटींचे पालन करणे. सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणुका किंवा इतर कार्यक्रमांमध्ये ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर करण्याकरिता सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे व परवानगीच्या सर्व अटींचे पालन करणे आवश्यक राहील.
४. ध्वनी व वायू प्रदूषण टाळा फटाके व ध्वनिवर्धक यंत्रणेमुळे ध्वनी प्रदूषण तसेच फटाक्यांमुळे वायू प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने सण / उत्सव साजरे करावेत.
५. फटाक्यांच्या वापराबाबत आवाहन तुलनेने कमी ध्वनी व कमी उत्सर्जन करणाऱ्या Green Crackers (हरित फटाके) चा वापर करण्यास प्राधान्य द्यावे. Green Crackers (हरित फटाके) म्हणजे तुलनेने कमी प्रदूषणकारी फटाके असून त्यांच्या निर्मितीमध्ये पारंपरिक फटाक्यांच्या तुलनेत प्रदूषक घटकांचे प्रमाण कमी ठेवले जाते.
६. Green Crackers (हरित फटाके) हे पूर्णपणे प्रदूषणमुक्त नसतात, त्यामुळे त्यांचा वापर करतानाही लागू असलेल्या नियमांचे व वेळेच्या मर्यादांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्र शासनाचे माझी वसुंधरा अभियान ७.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२६-२७ अभियानांतर्गत फटाकेमुक्त, प्लास्टिकमुक्त, कचरामुक्त, प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल, सण- उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करू. सदर अभियानांतर्गत नागरिकांनी फटाक्यांचा वापर टाळा, प्लास्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा, सण समारंभामध्ये टाकावू वस्तूंचा व पुनर्वापर करण्यायोग्य वस्तूंचा वापर जास्तीत जास्त करावा, पर्यावरणपूरक, प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करावी. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून शांत, सुरक्षित व प्रदूषणमुक्त सण उत्सव साजरे करण्याच्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी लातूर शहर महानगरपालिकेस सहकार्य करावे,

आयुक्त,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर